# श्रीसाईनाथ प्रसन्न.

श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संत चूडामणी कृपानिधि साई महाराज संस्थान मौजे शिर्डी तालुके कोपरगांव जि. अहमदनगर यांच्या श्रीरामनवमीच्या वार्षिक उत्सवाचा अहवाल व जमा खर्चाचा तपशील.

**जमा**

| | |
|---|---|
| १५१ | रघुनाथ नरहर बचुवार मु. खेड |
| *१८३॥।=॥ | गोविंद रघुनाथ दाभोळकर |
| १। | गणेश दिनकर वैद्य |
| ६ | इक्टर मु. ए. डोंगरे |
| १। | गोविंद प्रल्हाद घोणे |
| १ | सौ० सीताबाई राजाराम वालावलकर |
| २ | गोविंद रघुनाथ दाभोळकर |
| २१ | सौ० लक्ष्मीबाई नारायण गोरक्षकर |
| १ | रामराव दीनानाथ मदन |
| १॥≈। | नारायण गोविंद काजळे |
| १० | दाजी विठ्ठल सांबारे |
| २ | यशवंत जनार्दन गाळवणकर |
| २ | राजाराम केशव वालावलकर |
| १० | जी. डी. जोशी |
| १० | गोविंद नारायण दाभोळकर |
| १। | रामचंद्र भिकाजी जोशी |
| ४ | आनंदराव पर्शराम डोळ्स |
| २ | वामनराव माण गोविंद पटेल |
| २ | चिंतामण रघुनाथ सातघरे |

**नावें**

| | |
|---|---|
| १८५ | रामचंद्र आनंदराम मारवाडी यास रामनवमीच्या सामानाबद्दल |
| १३८- | जव्हारमल्ल तुकाराम मारवाडी यांस तांदळाबद्दल |
| ४। | रुपचंद बालचंद मारवाडी उपरणें जोडी २ बद्दल |
| ६८ | गोविंद काशिनाथ करंबेळकर राहाणार पुणे आच्यारी यास<br>३० स्वयंपाकाबद्दल<br>१५ जरीचें उपरणें १<br>१५ रेल्वे भाडें<br>६ दीनकर आच्यारी यास उपरणें पान १<br>२ गाडी भाडें<br>—<br>६८ |
| १८ | महमद सैदूभाई राहतेकर यास बाजाबद्दल |

---

* या रकमेच्या पोटरकमांची बेरीज रु. १८६८≈।- येते. परंतु सुंठवडा पाठविण्यास प्रसादाच्या पिशव्या तयार करणें व पोष्टेज वगैरे आलेला खर्च रु. २।८॥ वजा करून बाकीची रकम १८३॥।=॥ मुंबई ऑफिस मार्फत दासगणु यांस दिली होती तेवढीच त्यांनीं जमा धरलेली आहे.

५ आनंदराव सुंदरजी धुरंधर
१ बाळकृष्ण वामन वैद्य
५ आर्. बी. जुन्नरकर
१ जी. एस्. चौबळ
५ जगन्नाथ रामजी तांडेल
१ गजानन महादेव वायंगणकर
५ रामचंद्र रामकृष्ण सामंत
१० डॉ० रंगनाथ नारायण गव्हाणकर
१ सौ० यमुनाबाई रंगनाथ गव्हाणकर
१॥ रघुनंदन रंगनाथ गव्हाणकर
५ गोविंद नारायण सामंत
१ आत्माराम बाबाजी पेंडूरकर
३।॥ सांवळाराम आत्माराम शिरोडकर
१। सौ० राधाबाई सावळाराम शिरोडकर
५ त्रिंबक आनंदराव कर्णीक
२ द्वारकानाथ मुकुंद दुर्वे
१ शंकर अनंत प्रधान
१ गोविंद लक्ष्मण फणसे
२ पुरुषोत्तम गोपाळजी घडीयाळी
५ श्रीकृष्ण विनायक दीक्षित
२ वाय्. आर्. जुन्नरकर
५ सौ० लीलावतीबाई के० चोणकर
२। महादेव गंगाधर कोरान्ने
१० राजेबहादुर जगन्नाथराव गोपाळराव
२ देऊ हरशेट कालण

ला.

नांवे

१२१ शेक महंमद अबदुल मिया अकोळकर दारुवाला यांस
१०० शोभेच्या दारूबद्दल
१३ गाडीभाडें
७ इनाम
१ मुलास बक्षीस

१२१

१ महमद सैदु ताशेवाला
१४॥~। ब्राह्मण दक्षणा पंगतीची दिली
२२।≤ अभिषेकाची दक्षणा
१ परातीचे कल्हईबद्दल
१५।=॥ केशर, हिंग, चहा, चिंच, पोस्तेबदाम. हस्तें लक्ष्मीबाई जोगळेकर
११॥= भाजीपाला शिर्डीचे बाजारामधील घटाटे, भोपळे वगैरे
२९। बाबा धर्माधिकारी यांसी दिले त्याचा तपशील
१० रामायण वाचण्याबद्दलदक्षणा
१५ जरतारी उपरणें
पान १
४। रेल्वे व बैलगाडी भाडें

२९।

## खर्च

४ आंधळेपांगळे यांना दिले.
१॥ खुशालचंद रुपचंद पत्रावळीबद्दल द्वादशीस कमी पडलेल्या घेतल्या.

**जमा**

५ विनायक आप्पाजी वैद्य
१ बळवंत आप्पाजी वैद्य
१। चिंतामण महादेव चौबळ
१। हरीभाऊ विनायक चौबळ
१। अनंत बापूजी प्रधान
१। शंकर बाळकृष्ण वैद्य
५ श्री० जनाबाई सिताराम घटे
५ वेदशास्त्रसंपन्न श्रीपाद रामचंद्र तिरसीकर

---

१८३॥=॥.

२८८=॥ लक्ष्मीबाई जोगळेकर
२५ श्रीमंत सरकार नारायणराव बुळे इंदूर
२५ श्रीमंत भवानराव बनसुडे इंदूर
२५ बाळासाहेब रेगे वकील खांडवा
१६ हरलाल माणकलाल डहाणू
१५ माधवराव दादोबा महंत मुंबई
१५ नारायण जनार्दन तेंडुलकर
१२ द्वारकाप्रसाद रामलाल पराणकर सोलापुर
१० नारायण सदाशिव वडनगरकर
१० गणेश पांडुरंग बेंदरे अंधेरी
१० हरिचंद्र रामजी मिस्त्री अंधेरी
१० जीवनराम बाळकृष्ण बापु भैय्या कोठारी इंदूर
५ पार्वतीबाई शामराव कोठारी इंदूर
५ धोंडोपंत डॉक्टर मुंबई

**खर्च**

५ श्रीसाई महाराज यांचे नैवेद्याबरोबर दररोज १ रुपयाप्रमाणें ५ दिवसांचे.
५ प्रसादाचे नारळ.
८२८=। तूप डबे ३ त्यापैकीं १ डबा रुपये ३३ बाळा शिंपी यांनीं दास महाराज यांचे घेण्यांत दिला, व २ डबे तूप उमरीहून आलें.
२८८=॥ तांदळाचें पोतें हस्तें लक्ष्मीबाई जोगळेकर पुणें.
७॥= पत्रावळी — उमरीकडून आश्या हस्तें नारायण बंजारी चौदाशें पत्रावळी.
११ काशिनाथशास्त्री पंढरपूरकर यांस
५ दक्षणा पुराणाबद्दल
$\frac{६}{११}$ उपरण्याचें पान १
८॥ बाळागुरव उपरणें पान १
६ बाळा काशीराम शिंपी उपरणें १
६ गण्या चोपदार उपरणें पान १
५ नाना पुजारी उपरणें पान १
५ लक्ष्मण भट्ट उपरणें पान १
४ मार्तंड भगत उपरणें पान १
३ महादु फसल्या उपरणें पान १
१०॥ पालखी उचलणारे इसम, अप्पा यादव बयाजी रामा
१॥ शिंगाड्या उपरणें १
४ ताशेवाला शिर्डीचा उपरणें १
१॥ अहेल्या मादुकऱ्या उपरणें १

**जमा**

५ रामचंद्र सितारामदेव अंधेरी
५ वामनराव औरंगाबादकर
५ राजबहादरीणबाई मालेगांवकर
५ पिरुबाई रामराव कोटारी
८ काकासाहेब महाजनी मार्फत
२ पिरोजीबाई विजयोकर
१ रामचंद्र गंगाधर महाजनी
१० एका भक्ताकडून
१। लक्ष्मण महादेव प्रधान शाहापूर
१। भागीरथीबाई अनंत सखाराम जाधव अंधेरी
-॥- राजाराम गणोजी शाहापूर
२ संतुबाई अंधेरी
५ भगवानराव गंगा खेडकर नांदेड
११ गोविंद व्यंकटी महाजनी मुखेड
२६ बाबा रामचंद्र पत्तेवार मुखेड
५ शंकरराव संग्रामा अतनुर
२५ अण्णासाहेब देशमुख बोन्हाळकर इंगोली
५ गणेश केशव रेगे असिसाहेब
७ यशवंतराव पाटील जामगांवकर
५ दत्तात्रय राजाराम पांडे मांजरम
११ चनैया मुकावार मुखेड
१५ धोंडोपंत वकील नांदेड
५ चंद्रभागाबाई भ्रतार दामोदर पांडे मांजरम
६ बापुराव नाना गुळाची ढेप१
६ वामन गोंदकर गुळाची ढेप१

**खर्च**

२६॥। लक्ष्मण गुरव तवलजी कलमनुरी यांस दिले त्याचा तपशील
१० रोख
८॥ उपरणें पान १
८। गाडी रेल्वे भाडें
———
२६॥।

५ अल्लाउद्दीन खतीबसाहेब काजीकलमनुरी
१० किसनराव आबाजी कासार पाथरी यास जाण्यायेण्याचे भाड्याबद्दल
-।॥= सगुण मिरु नाईक ग्लासवत्या व आगपेट्यांबद्दल
३॥। गीताबाई, गमाबाई, ठकुबाई, राईबाई सरुबाई, मोलकरिणी
१ आनाजी कुंभार रांजण मडकेबद्दल
१ मधु न्हावी दिवे लावण्याबद्दल
१ गोपाळा रंभाजी गोंदकर
-।- पुंजा कोळी भांडी घासण्याबद्दल
१ मल्हारी परीट पाणी तापविणें बद्दल
२॥ महादू परीट धोतरें धुण्याबद्दल
१ रोख
१॥ साधें उपरणें
———
२॥
२ वजंभट पुण तांबेकर व नानूभट याचा मामा असे प्रत्येकास रु० १ प्रों.

**जमा**

| | |
|---|---|
| ६ | बापूराव पुणेकर गुळाची ढेप १ |
| २८ | नागोबा वंजारी तुपाचा डबा १ |
| १४ | व्यंकोबा रंगारी तुपाचा डबा अर्धा |
| १४ | बाबा रंगारी तुपाचा डबा अर्धा |
| ९ | नारायण वंजारी पत्रावळी व तिखट |
| २५ | रंगनाथराव दादासाहेब वरुडकर वकील कलमनुरी |
| ११ | नागोराव गोविंद उंचेगांवकर |
| ११ | राजेश्वरराव गांजापूरकर |
| ५ | भगवानराव मांजरमकर पांडे |
| २ | भाऊराव नौदीकर देशपांडे |
| ८५४४८- | |
| १७४।≈।।। * | कमी पडलेले |
| १०२८।ञा।। | |

**खर्च**

| | |
|---|---|
| १ | तुकाराम गुरव नकले |
| ८ञा।। | लक्ष्मी मारवाडी हनुमान जयंतीचे सामानाबद्दल ८ञा।।- |
| २४।-।। | मुलतानचंद--- मारवाडी हनुमान जयंतीचे सामानाबद्दल. |

**नांवें**

| | |
|---|---|
| ५।।≈ | अनाथ विद्यार्थी यांस विद्यार्जनाप्रित्यर्थ दिले. हस्ते दाजी वामन चिदंबर पावतीवर हुकूम |
| १६।।≈ | कनीराम आनंदराम मारवाडी हनुमानजयंतीचे सामानाबद्दल |
| २९।-।। | श्रीसाईबाबांकडील ५ दिवसांत झालेला खर्च हस्तें रामचंद्र पाटील कोते. |
| ३७।।≈ | हनुमानजयंतीचे महार-मांग, चांभार, वडारी, भिल्ल वगैरेना बेसनाच्या लाडवाचें भोजन दिलें. गुळाच्या भेल्या २ हस्तें बाबुराव सखाराम |
| ३।। | गोरगरीबांस कपडे केले त्याबद्दल दाम. हस्तें बाळा काशीराम |
| १।। | दाजी शेलका, रामा न्हावी गबा सुतार भाजीबद्दल |
| ८।। | चुकारी गाड्याबद्दल दिले. रामचंद्र पाटलानें आणल्या त्या |

* कमी पडलेले दासगणू व मोंगलाईतील मंडळीं यांनीं दिले.

नांवे

२॥≶ रेल्वेभाडें तांदळाच्या पोत्या-
चे हस्तें रामचंद्र पाटील.

१० अबदुल भाई मुजावर
कफनीबद्दल

२९॥≈ फराळाचे लाडू पांच दिव-
सांचे हस्तें दादासाहेब
वरूडकर

२६॥≶। पांच दिवसांचे व चहाचे
एकंदर दूध

३ चहाचे डबे त्याबद्दल हस्तें
लक्ष्मीबाई जोगळेकर

७ चिवडा पांच दिवसांचा

९॥ संत्रीं व मोसंबी पांच दिव-
सांची

१ टरबुजें भाजीकरितां घेतलीं

१ लालभुजकड बुवा उर्फ ल(-
कनदास उजवशंखवाला
यांस तात्या पाटील यांचे
सांगण्यावरून दिला.

३॥≈ फिरकोळ खर्च

५ उद्बत्तीचा पुडा १ हस्तें
भवानीशंकर गणपत
ससीतळ

-॥≈ शिप्याची शिलाई.

८ गोरगरीबांस वाटण्याकरितां

१० सरपण घेतलें त्याबद्दल हस्तें
विठोबा सुतार

५॥-' एकादशीस फराळाचे सामान
बद्दल

१९॥ तांदुळ पायली तेरा हस्तें
गोविंद रघुनाथ दाभोळकर

नांवें

१ गोपाळा रंभाजी गोंदकर यास नवलकर यांचे बखळजागेच्या दुरुस्तीची मजुरी

१ बालक भाऊ भाऊ तांबोळी उत्सवाचे विड्याचे पाना बद्दल

———————

१०२८।≋।॥ एकूण दहाशें अठ्ठावीस रुपये सात आणे नऊ पै

येणेंप्रमाणें तपशील चरणीं सादर केला आहे. त्यांत चूकभूल असेल त्याची माफी असावी. या रामनवमीचे उत्सवास मोंगलाईतून मजबरोबर भगवानराव मांजरमकर, त्रिंबकमहाराज अंदारकर, किसनराव आबाजी कासार पाथरीकर, विठ्ठलराव रामदुर्गकर, तुकाराम केशवगुरु आजेगांवकर, दत्तोपंत कस्तुर कामनुरीकर, गोविंद पाथरीकर, दत्तोपंत मांजरमकर, अशी मंडळी आली. मागाहून गोविंद व्यंकटी महाजन, भाऊराव नावंदीकर, भगवानराव गंगाखेडकर, दिगंबरराव नांदेडकर, रंगनाथराव दादासाहेब वरुडकर, नागोराव उंचेगावकर, राजेश्वरराव गांजापुरकर, दादा सबनीस, लक्ष्मणराव गुरव कळमनुरीकर, नागोबा वंजारी, नारायण वंजारी, व्यंकोबा रंगारी, सखाराम कुलकुडगी अशी मंडळी बायकापोरांसहीत उत्सवास आली व अण्णासाहेब बोन्हाळकर, राजासाहेब माझोडकर यांना जरुरीचे कामामुळें येतां आलें नाहीं. पापालाल मुलीचें लग्न असल्यामुळें येऊं शकला नाहीं. चनैया मुकावार हा गांवाबाहेर असल्यामुळें आला नाहीं. बाबापत्तेवारनें आपला मुलगा दिगंबर रामचंद्र पत्तेवार यांस पाठविलें होतें. शिवाय अल्लाउदीनसाहेब काजी कळमनुरी हेही आले होते. पुण्याहून बहिनीबाई जोगळेकर, अंधेरीहून वैंडर, मास्तर, मिस्त्री, मुंबईहून नारायण जनार्दन तेंडूलकर, धोंडोपंत डॉक्टर, खांडव्याहून बाळासाहेब रेगे व इंदूरहून भवानराव बनसुडे, वडनगरहून नानासाहेब इनामदार, पंढरपुराहून कृष्णाजीपंत गोगटे, काशीकरशास्त्री पुण्याहून मामा-

साहेब, नगराहून बाबा धर्माधिकारी व मुंबईच्या मंडळी पैकीं, काकासाहेब दीक्षित, काकासाहेब महाजनी, रावसाहेब दाभोळकर, सामंत, पुरंदरे व आणखी कांहीं मंडळी आली होती. उत्सवास पुणतांबे संगमनेर, कोन्हाळें, कोपरगांव, वगैरे ठिकाणची भटजी मंडळी आली होती. बेलापुराहून बापूराव पुणेकर आपल्या सर्व बायका मुलांसहीत व मित्र--सोयऱ्याधायऱ्यांसहीत आले होते. तरी या सर्व मंडळीवर आपली कृपा असावी. ज्यांनीं ज्यांनीं या उत्सवास द्रव्यद्वारा व अन्य साधनांनी साह्य केलें त्यांवरही आपली कृपा असावी. रघुनाथ बघुवार हा पुण्यास बायको आजारी असल्यामुळें येऊं शकला नाहीं, तरी त्यावर आपली कृपा असावी. गोविंद महाजन यांनीं स्वतः कोठी सांभाळून वाण्याचाहिशोब पाहून जमाखर्चाची सर्व व्यवस्था ठेविली. उत्सवास यासालीं तीन पक्वान्नें केलीं होतीं, हनुमान जयंतीस गोरगरीबाकरितां बेसनाचे लाडू केले होते. चालू सालीं मंडळी दरसालपेक्षां जास्त होती. पुण्याच्या गोविंद आचाऱ्यानें स्वयंपाकाची व्यवस्था उत्तम केली होती. त्यांत माझ्या हातून जाणून न जाणून ज्या कांहीं चुका झाल्या असतील त्यांची या दासाला माफी असावी. असेंच सालोसाल ह्या सकल संतांचा चरणरज जो मी दास गणू त्याच्या हस्तें सेवा घेत जावी अशी माझी नम्र विनंति आपल्या पवित्र चरणापाशीं आहे. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

सकल संतांचा चरणरज

**दास गणू**

# अध्याय ४१ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

हेंच साईकथेचें महिमान । कीर्तीहीपरिसा नलगे प्रोत्साहन ॥
श्रोतेच राखूनि पूर्वानुसंधान । अति सावधान श्रवणार्थी ॥ १ ॥

करावया कथापान । जेथें श्रोतेच सावधान ॥
किमर्थ मग प्रार्थावें अवधान । वृत्ती जें एकतान आधींच ॥ २ ॥

गातांपरिसतां निजगुरु महती । होईल निर्मळ चित्तवृत्ती ॥
दृढ ध्यान नामानुवृत्ती । सुखैक मूर्ती प्रकटेल ॥ ३ ॥

गताध्यायीं जाहलें कथन । कैसें एकाव्रताचें उद्यापन ॥
यथा सांग जाहलें पूर्ण । दृष्टांत खूण समवेत ॥ ४ ॥

तैसीच साईची पार्थिव छवी । कवण्या परी आकस्मिक यावी ॥
कैसी वेळेवर इच्छा पुरवावी । कथा परिसावी ही आतां ॥ ५ ॥

एका होळीचिया सणा । येतों मी आज घाली भोजना ॥
साई ऐसिया देऊनि स्वप्ना । होय मनकामना पुरवीता ॥ ६ ॥

कथा ही पूर्वींच कथिली सविस्तर । परी ती प्रतिमा कैसी वेळेवर ॥
यावी हा कैसा काय चमत्कार । तें आज सादर परिसावें ॥ ७ ॥

कथा सांगे अल्ली महमद। वाटली परम आश्चर्यप्रद ॥
ही तरी एक लीलाच विशद। अति विनोदकारक ॥ ८ ॥

यानींच ती होळीच्या दिवसी। आम्ही दुपारा जेवावयासीं ॥
बैसावयाचे ऐन समयासी। आणूनि उल्लासित केलें मज ॥ ९ ॥

हें तो पूर्वील कथानुसंधान। आतां श्रोतां सावधान ॥
परिसिजे पुढील निरूपण। चरित्र पावन साईचें ॥ १० ॥

ती ही कथा सरस पूर्ण। श्रोते आधींच दत्तावधान ॥
वक्ता साईपदीं लीन। चरित्र गहन साईचें ॥ ११ ॥

परोपकाराची ती प्रतिमा। परोपकारार्थ झिजवी आत्मा ॥
सदा सर्वदा निर्वैरधर्मा अखंड सत्कर्मा वाहिला ॥ १२ ॥

बरी वाईट कैसीही स्थिती। देहकर्में देहानसुटती ॥
परी ती लावा अंतर्वृत्ती। गुरुचरणीं प्रीतीपूर्वक ॥ १३ ॥

मग निजभक्ताचा योग क्षेम। गुरु कैसा चालवी अविश्रम ॥
तें गुरुचरणीं ठेवूनि प्रेम। पहा अत्युत्तम अनुभवें ॥ १४ ॥

हे स्थिती मागितल्या न मिळे। ठायीं पडे गुरुकीर्तन मेळें ॥
जें न महत्प्रयत्नेंही आतळे। तें गुरुकृपाबळें चालत ये ॥ १५ ॥

धरोनिया दुरभिमान। करूं आले जे सूक्ष्मनिरीक्षण।
तेही सर्व परतले त्यक्ताभिमान। सुखायमान दर्शनसुखें ॥ १६ ॥

यश श्री औदार्य-ज्ञान। शांती वैराग्य हे षड्गुण ॥
ईहीं श्रीसाई भगवंत पूर्ण। ऐश्वर्यें संपूर्ण हरि जैसा ॥ १७ ॥

किती हो आमुचे भाग्य गहन। जेणें हा साईचैतन्य घन।
विनाअर्चन पूजन भजन। देई दर्शन आम्हा तें ॥ १८ ॥

म्हणती भक्तीपाशीं देव। आम्हापाशीं भक्तीचा अभाव ॥
परी हा साई महानुभाव। कनवाळू स्वभाव दीनार्थ ॥ १९ ॥

असो तो अलीच वदेजी आतां। श्रोतां साद्यंत ऐकिजे वार्तांत ॥
कळेल साईलीला गहनता। आणीक निजसत्ता तयाची ॥ २० ॥
एके दिवशीं मुंबानगरीं। फिरत असतां रस्त्यावरी ॥
चित्रें मनोहर आणि तसबिरी। विकणारा व्यापारी अवलोकिला ॥ २१॥
चित्रें सुंदर नानापरीचीं। संता महंता अवलियांची ॥
पाहोनि जाहली वृत्ती मनाची। कवणा कवणाचीं तीं पाहूं ॥ २२ ॥
म्हणोनि एकेक पाहूं लागतां। आवडली ही तसबीर चित्ता ॥
सर्वांहूनि तीची मोहकता। शिवाय तीं आराध्य देवताही ॥ २३ ॥
आधींच मनीं साईंची आवड। सन्मुखतयांची मूर्तीही उघड ॥
पाहूनि घ्यावया जाहली तांतड। किंमत मी रोकड मोजिली ॥ २४ ॥
मग ती तसबीर आणिली घरीं। टांगून ठेविली भिंतीवरी ॥
आनंदें नित्यदर्शन करीं। प्रेमहि मज भारी बाबांचें ॥ २५ ॥
दिधली मीही तुम्हापाशीं। तया आधीं तिसरे मासीं ॥
आराम नव्हता माझिये जीवाशी। राहिलों सहवासीं मेहुण्याच्या ॥ २६॥
नूरमहमद पीर भॉय। मेहुणा हा मजला होय ॥
सुजला होता माझा पाय। केला मज उपाय शस्त्रक्रियेचा ॥ २७ ॥
ऐसा असतां दुखणाईत। तीन महिने राहिलों तेथ ॥
कोणीच नव्हतें माझिये घरांत। या तीन महिन्यांत वस्तीस ॥ २८ ॥
प्रसिद्ध बाबा अबदुल रहिमान। मौलाना साब महमद हुसेन ॥
बाबासाई बाबा ताजुद्दिन। इहीं न तें स्थान त्यागिलें ॥ २९ ॥
हे सर्व आणि ऐसेच इतर। यांचीं छाया चित्रें भिंतीवर ॥
होतीं माझिये घरांत मनोहर। सोडी न हें कालचक्र तयांही ॥ ३० ॥
माझी इकडे ऐसी गती। चित्रांमागें कां साडेसाती ॥
वाटे वस्तूसी होतां उत्पत्ती। प्रलय स्थितीही दुर्लंघ्य ॥ ३१ ॥

असो ऐसी असतां परिस्थिती । साईच कैसे त्यांतून चुकती ॥
हें तो हा काळ वरी ही मज प्रती । कोणीही न सकती सांगावया ॥ ३२॥
ये विषयींची समूळ कथा । विस्मय वाटेल तुम्हां परिसतां ॥
कळेल साईची स्थिरचरात्मकता । अतर्क्य विंदानता तयाची ॥ ३३ ॥
संतबाबा अबदुल रहिमान । यांचे एकचित्र लहान ॥
महमदहुसेन थारियाटोपण । यांचे स्वाधीन होतें कीं ॥ ३४ ॥
तेणें तयाची मज एक प्रत । दिधल्या जाहलीं वर्षें बहुत ॥
ती मी माझे मेहुण्यास देत । कीं ते अंकित तयांचे ॥ ३५ ॥
तीही आठ वर्षेंपर्यंत । होती तयाचे मेजाचे खणांत ॥
सहज एकदां आढळतां अवचित । नेली ती दुकानांत मुंबईस ॥ ३६ ॥
जितुके बाबा अबदुल मोठे । चित्रहि करविलें तेवढें गोमटें ॥
कीं तें न्यावें तयांचिया भेटे । प्रेमहि दाटेल तदंतरीं ॥ ३७ ॥
तयावरून घेतल्या नकला । आप्तेष्टमित्रां दिधल्या सकळां ॥
त्यांतीलचि एक दिधली मजला । होती मी भिंतीला लाविलेली ॥३८॥
मग ती परम सुंदर तसबीर । भरतां अबदुल रहिमान दरबार ॥
नूरमहमद जाहला तत्पर । करावया सादर त्या संता ॥ ३९ ॥
पाहूनि हें तयाचें मन । चित्र पाहतांच अबदुल रहिमान ॥
जाहल अत्यंत कोपायमान । उठले त्या ताडण करावया ॥ ४० ॥
करूनिया निर्भत्सन । दिधलें तयास घालवून ॥
तेणें तो अत्यंत खिन्नवदन । चिंतागहन उद्भवली ॥ ४१ ॥
मग तो होऊनि हीनदीन । उदास आणि उद्विग्नमन ॥
पैक्यापरी पैकाही जाऊन । गुरुकृपे विघ्न उद्भवलें ॥ ४२ ॥

१ बाबा अबदुल रहिमानचे २ फोटोग्राफरचे दुकानांत ३ भेट देण्यास

होतों आज गुरुकृपा संपन्न । तोच मी झालों रोषास कारण ॥
ऐसें वदून साशंक होऊन । चित्र विसर्जन आरंभी ॥ ४३ ॥

म्हणे आतां या संतप्रतिमा । कधींही न घरीं ठेवितां कामा ॥
तेणेंच अंतरलों निज गुरुप्रेमा । किमर्थ रिकामा हा धंदा ॥ ४४ ॥

म्हणे जया चित्राच्या पायीं । गुरु माझा मज नाराज होई ॥
पाडील कधीं तरी तें अपायीं । तें मज नाहीं कामाचें ॥ ४५ ॥

हें तरी एक प्रतिमापूजन । नावडे मम गुरू लागून ॥
तरी मग या नाराज ठेवून । चित्राचें प्रयोजन काय मज ॥ ४६ ॥

जाहला बहु द्रव्यव्यय । करावया या चित्रांचा संचय ॥
तरी त्या आतां न दुजा उपाय । शिवाय तोय विसर्जना ॥ ४७ ॥

म्हणोन मग माझा मेहुणा । सर्वं घेऊन ती छवी जाणा ॥
न देतां ही मागतिया कवणा । पातले विसर्जना धक्क्यावर ॥ ४८ ॥

गेले अपालो बंदरीं थेट । ठरविली एक भाड्यानें बोट ॥
जाववेल तों जाऊनि थेट । समुद्रीं ती शेवट विसर्जिली ॥ ४९ ॥

असो ते येथेंच नांहीं थांबले । वांद्रे येथें ही तेंच आरंभिलें ॥
सर्वा आप्तेष्टमित्रां विनविलें । फोटो घेतले मागून ॥ ५० ॥

म्हणाले बाबा अबदुल कोपले । फोटो ज्याणीं त्याणीं आपले ॥
परत द्यावे पाहिजे विसर्जिले । सकळां विनविलें एणे परी ॥ ५१ ॥

मजकडूनही दिधलेली प्रत । घेतली माझे भावाचीही परत ॥
बहिणीचीही केली हस्तगत । मिळविल्या समस्त सहा प्रती ॥ ५२ ॥

मग तो घेऊनि सहाही प्रती । वांद्रे शहरीं समुद्रावरती ॥
थेट जेथें जमीन सरती । पातला ते प्रांतीं सरोष ॥ ५३ ॥

१ ल्यांडसऐंड

पाचारूनि एक कोळी । मग तीं अवघीं चित्रें ते काळीं ॥
करूंनियां तयाचे हवालीं । निक्षेपियेलीं अब्धि जलीं ॥ ५४ ॥

मीही तेव्हां व्यथाग्रस्त । होतों तयाचिया घरांत ॥
मलाही तो ऐसेंच उपदेशित । संकटें आणीत या प्रती ॥ ५५ ॥

तरी त्या अवघ्या गोळा करून । करिसील जेव्हां समुद्रीं विसर्जन ॥
तेव्हांच तुझिया व्यथेचें निरसन । होईल जाण निर्धारें ॥ ५६ ॥

मीही माझा पाचारिला मेथा । किल्ली देऊनि त्याचिये हाता ॥
आणविल्या तसबिरी संतांच्या समस्ता । सोंपिली व्यवस्था मेहुण्यातें ॥५६॥

त्यानें अपुला बोलविला माळी । तया करवी त्या तात्काळी ॥
चिंबाईच्या देवळा जवळी । समुद्रजळीं निक्षेपविल्या ॥ ५७ ॥

पुढें जातां दोन मास । होतां आराम मम जीवास ॥
जातां मी अपुलिया बिऱ्हाडास । अति आश्चर्यास पावलों ॥ ५८ ॥

तुम्हांस म्या जी दिली तसबीर । ती द्वारा समोरचि भिंतीवर ॥
पाहोनिया पूर्ववत स्थीर । वाटला मज थोर विस्मय ॥ ५९ ॥

अवघीं चित्रें मेथानें आणिलीं । हीच तसबीर कैसी कीं चुकली ॥
म्हणोनि मी ती तात्काळ काढिली । छपवून ठेविली कपाटीं ॥ ६० ॥

पडतांच मेहुण्याची दृष्टि । घेईल तो ती उठाउठी ॥
नेईल जळसमाधी साठीं । ऐसें मज पोटीं वाटलें ॥ ६१ ॥

ठेवों न लाहे निज गृहातें । मेहुणा पाहतांचि बुडवील हातें ॥
देवों न लाहे आणिकातें । निःशंक चित्तें अभक्ता ॥ ६२ ॥

विना विचारें देईन कवणा । तरी न झालिया योग्य जोपासना ॥
राहील अस्वस्थता सदैव मना । ही दीर्घ विवंचना सर्वदा ॥ ६३ ॥

तरी तें जेथें राहील सुरक्षित । पहावें ऐसें स्थळ त्या उचित ॥
ठेवील अपुले घरीं जो व्यवस्थित । तयाच्या हस्तगत करावें ॥ ६४ ॥

ऐसें मन पडतां अडकित्तां । साईच सुविचार सुचवी चित्ता ॥
जावें मौलाना दरबारीं आतां । इसमूस वृत्तांत कथावें ॥ ६५ ॥

मग मी तेव्हां तैसाचि सत्वरी । गेलों पीर मौलाना दरबारीं ॥
मुजावर इस्मूस ही वार्ता सारी । कळविली अत्यादरीं एकांतीं ॥ ६६ ॥

आम्हा उभयतांचा निर्णय । अपुलेपाशीं राहील ही निर्भय ॥
म्हणोनि ते दिनींच आम्ही उभय । केला कीं निश्चय मनाचा ॥ ६७ ॥

कीं हीं समर्थ साईची छबी । अपुले येथेंच ठेविली जावी ॥
स्वयें आपणा समर्पावी । तेणेंच ती ठायीं पडेल ॥ ६८ ॥

तंव त्या कृत निश्चयानुसार । केली ती प्रतिमा आपणा सादर ॥
पाहूनि आपुलें जेवण तयार । तसाच मी सत्वर परतलों ॥ ६९ ॥

ही लांब कथा परिसावयास । नव्हता आपणा तेव्हां अवकाश ॥
पुढें मागें कथूं ती सावकाश । धरूनि हा उद्देश गेलों मी ॥ ७० ॥

आज उद्यां करितां करितां । सबंध नऊ वर्षे भरतां ॥
आज ही झाली भेट अवचिता । आपणा उभयतां परस्पर ॥ ७१ ॥

तेणें ही आठवली पूर्वपीठिका । आपणही कथिलें स्वप्न कौतुका ॥
संबंध जुळला अपूर्व कथानका । नाहीं अद्भुत का ही लीला ॥ ७२ ॥

आतां एक दुजी कथा । सावध चित्तें परिसिजे श्रोतां ॥
साई कैसा प्रेमळ भक्तां । अति सप्रेमता वागवित ॥ ७३ ॥

ज्या परमार्थीं खरी गोडी । तयांची साईस मोठी आवडी ॥
वारूनि सर्व तयांचीं सांकडी । स्वानंद जोडी दे तयां ॥ ७४ ॥

ये अर्थीचा अनुभव गोड । बाळासाहेब[1] देवांची होड ॥
पुरविली पुरवूनि तयांचें कोड । दिधली त्यां जोड भक्तीची ॥ ७५ ॥

---

१ अ० ४० यांत उद्यापनाची कथा ज्यांची दिलेली आहे तेच हे बाळासाहेब देव.

दिवसा नोकरी केल्याशिवाय । योगक्षेमा नव्हता उपाय ॥
परी रात्रौ परमार्थ व्यवसाय । कराया व्यत्यय कां यावा ॥ ७६ ॥

इच्छा फार दिवसापासून । करावें नित्य ज्ञानेश्वरी वाचन ॥
परी कांहीं ना कांहीं विघ्न । येऊन तें हातून घडेना ॥ ७७ ॥

भगवद्गीता एक अध्याय । जैसा रोज नेमानें होय ॥
तैसाच ज्ञानेश्वरीचा निश्चय । विना अंतराय तगेना ॥ ७८ ॥

हातीं घेतां इतर ग्रंथ । नित्य नेमें वाचिले जात ॥
ज्ञानेश्वरीवरी प्रबल हेत । नियम न जात तडीस ॥ ७९ ॥

घेऊनि रजा तीन मास । एकदां देव गेले शिर्डीस ॥
तेथून निजगृहीं पौंडास । सुखें घ्यावयास विश्रांती ॥ ८० ॥

तेथेंही इतर कार्यें झालीं । इतर नेमाची पोथी वाचिली ॥
ज्ञानेश्वरीची हौस न पुरली । वेळ न आली तियेला ॥ ८१ ॥

हातीं घेतां ज्ञानेश्वरी । विकल्प कांहीं उठावे अंतरीं ॥
जेणें वाचन होई वरवरी । प्रेम अंतरीं उपजेना ॥ ८२ ॥

काय करून कासाविसी । केला निश्चय न पावे सिद्धीसी ॥
पांच ओव्याही नित्य नेमेसी । घडलें न प्रतिदिवशीं वाचावया ॥८३॥

प्रत्यही पांच ओव्या निदान । निश्चय केला मनापासून ॥
त्याही न नेमें मज हातून । उल्हासें वाचून जाहल्या ॥ ८४ ॥

म्हणोनि मग केला नेम । साईच जेव्हां देतील प्रेम ॥
म्हणतील " वाच " तेव्हांच उपक्रम । करीन संभ्रम निरसीत ॥ ८५

निष्ठा साईच्या पायापाशीं । जेव्हां साई देतील आज्ञेशीं ॥
तेव्हांच वाचीन ज्ञानेश्वरीशीं । कृत निश्चयेसीं बैसलों ॥ ८६ ॥

असो येतां महोदय पर्व । सवें मातोश्री भगिनी सर्व ॥
न्हावया गुरू पूजा गौरव । पातले मग देव शिर्डीस ॥ ८७ ॥
कांहो आताशा नाहीं वाचत । ज्ञानेश्वरी आपण नित्य ॥
जोग तेथें देवांसी पुसत । प्रत्युतर देत तें परिसावें ॥ ८८ ॥
ज्ञानेश्वरीची मोठी हौस । परी न ती जाई सिद्धीस ॥
आतां बाबाच जेव्हां वाचावयास । वदतील ते वेळेस वाचीन ॥ ८९ ॥
तंव जोग कथिती युक्ती । ज्ञानेश्वरीची आणून पोथी ॥
द्यावी साईबाबांचिये हातीं । वाचावी ते देती तव तुम्ही ॥ ९० ॥
नलगे मज कांहीं युक्ति । बाबा माझें अंतर जाणती ॥
तें कां न माझी अढी पुरवीती । 'वाच' स्पष्टोक्ति वदतील ॥ ९१ ॥
घेतां समर्थाचें दर्शन । रुपया एक केला अर्पण ॥
एकचि कां वीस आण । म्हणती त्यालागून तंव बाबा ॥ ९२ ॥
आणून वीस रुपये दिधले । रात्रीं बालक रामास भेटले ॥
साईकृपा कैसी पावले । वृत्त त्यां पुसिलें पूर्वील ॥ ९३ ॥
उद्या आरती झाल्यावरती । सांगेन मी सकळ तुम्हाप्रती ॥
ऐसें बाळक राम आश्वासिती । बरें म्हणती देव तया ॥ ९४ ॥
पुन्हा देव दुसरे दिवशीं । जातां मशीदी दर्शनाशीं ॥
वीस रुपये मागितले त्यांशीं । दिधले सुख संतोषीं देवानें ॥ ९५ ॥
पाहूनि तेथें अत्यंत बीड । देव राहिले बाजूस आड ॥
बाबा पुसती कोठेरे सांकड । जागेंत अवघड तो दडला ॥ ९६ ॥
देती देव प्रत्युत्तर तेथें । बाबा हा मी आहे ना येथें ॥
कां सातचि ना झालेत देते । बाबा तंव तयातें पुसतात ॥ ९७ ॥

१ इ० स० १९१४ चा फेब्रुवारी महिना.

देव वदती वीस दिधले। पैसे कोणाचे बाबांनीं पुसलें ॥
बाबा अपुले तंव ते वदले। कां मग सुटले पळत तुम्ही ॥ ९८ ॥
यावें ऐसें जवळ यावें। स्वस्थ चित्तें निकट बैसावें ॥
आज्ञेप्रमाणें केलें देवें। मनोभावें तें बैसले ॥ ९९ ॥

नित्यनेम आरती झाली। मंडळी स्वस्थानीं परतली ॥
बाळक रामा देवा गांठ पडली। पृच्छा ती आरंभिली पूर्वील ॥१००॥
तयांचा पूर्ववृत्तांत पुसिला। तयांनीं तो साद्यंत कथिला ॥
कैसें लावियलें उपासनेला। देव मग तयाला वदतात ॥ १०१ ॥
केलें काय तुम्हा निवेदन। कैसें करावें ब्रह्मचिंतन ॥
करावीं माझी जिज्ञासापूर्ण। देव मग त्यांलागून प्रार्थिती ॥ १०२ ॥
बालक रामही देवांप्रती। करावया तयांची जिज्ञासापूर्ती ॥
उत्तर द्याया जों आरंभकरिती। बाबाच बोलाविती देवांस ॥ १०३ ॥
कैसा साई परम लाघवी। चंद्रसं देवांते बोलावूं पाठवी ॥
देव न क्षण विलंब लावी। आले श्रीसाईस भेटाया ॥ १०४ ॥
झाले होते तीन प्रहर। मशीदीचिया तटावर ॥
टेकूनिया दोन्ही कर। दिसले समोरचि श्रीसाई ॥ १०५ ॥
देव जातांच केलें वंदन। बाबा तयांस पुसती प्रश्न ॥
कोठें कोणासीं काय आपण। करीत संभाषण होतां कीं ॥१०६ ॥
मग देव उत्तर देती। काकांचिया माडीवरतीं ॥
बालकरामाचिया संगतीं। आपुलीच कीर्ति परिसियली ॥ १०७ ॥
रुपये आण पंचवीस। बाबा आज्ञापिती देवांस ॥
आणूनिया तेच समयास। रुपये बाबांस समर्पिले ॥ १०८ ॥

---

१ या नावाचा एक व्यक्तिष्ट त्यावेळीं बाबापाशीं होता

केती पुसती आणिलेस । देव वदती पंचवीस ॥
ाबा म्हणती चलये बैस । गेले तव मशीदीस बाबांसह ॥ १०९ ॥
ाबा बैसले खांबापाशीं । दुजे न कोणीही मशीदीसीं ॥
म्हणती तुवां माझिये चिंधीसी । चोरियेलेसीं मज न कळतां ॥ ११० ॥
का चिंधी ठाऊक नाहीं । म्हणोनि देव देती ग्वाही ॥
येथेंच कोठें तरी पाही । झाले मग साई वदते तया ॥ ११ ॥
येथें आहे कोठें चिंधी । ऐसें देव वदले ते संधीं ॥
ाबा उठले म्हणती तूं शोधी । खोटी ही बुद्धि चोरीची ॥ ११२ ॥
कवण्या कारट्यानें ती नेली । बघ बघ पाहिजे येथेंच असली ॥
ऐकून देवांनी आणीक शोधिली । नाहीं ती आढळली तरी ही ॥११३॥
मग भृकुटीस घालून आंकडे । पाहूनियां इकडे तिकडे ॥
दृष्टि टवकारुनी देवाकडे । साई कडकडे देवांवर ॥ ११४ ॥
म्हणे तूंच लबाड होसी । तुजवीण कोण ये समयासी ॥
येईल चिंधी चोरावयासी । चोर मी तुजसींच समजतों ॥ ११५ ॥
ऐसा येथें जो येतोस । तो काय चोऱ्या करावयास ॥
झाले काळ्याचे पांढरे केंस । खोड न लवलेश कीं जाई ॥ ११६ ॥
तुला कुऱ्हाडीनें हाणीन । तुला कापीन ठार करीन ॥
जाशील कोठें माझिया हातून । येईन मारीन तेथें तुज ॥ ११७ ॥
घरून येतोस जो शिरडीस । तो काय चोऱ्या करावयास ॥
े हे अपुले वापस । आणून चिंधीस दे माझ्या ॥ ११८ ॥
क्रोधें लाल झाले साई । उद्धारियेली आई माई ॥
शिव्या-शापांची लागली रयी । संतापें लाही जाहली ॥ ११९ ॥
कोपले देखूनि साईनाथ । देव कौतुक पाहतात ॥
उगेच उभे राहतात । आश्चर्यभरित मानसें ॥ १२० ॥

देव सन्निध आणि एकटे । पाळी माराची येणार वाटे ॥
कीं हे विश्वरूप दर्शन गोमटें । जाणूनि दाटे आनंद ॥ १२१ ॥

घेतील काय सटका आतां । करितील काय त्वेषें आघातां ॥
एकला मी सांपडलों हाता । येईल चित्ता ते करो ॥ १२२ ॥

परी हें चिंधीचें काय कोडें । तें तों देवांस कांहींही नुलगडे ॥
जा निघून जा म्हणतां एकीकडे । तवते पायरीकडे सरकले ॥ १२

काय चिंधीचा गुह्यार्थ । जाणावया मी नाहीं समर्थ ॥
पावेन साईकृपेचा स्वार्थ । तयीं तो श्रोत्यांर्थ निवेदीन ॥ १२४ ॥

होतां अर्ध घटकाभर । आले देव बाबां समोर ॥
चालूच होता शिव्यांचा गजर । आलास कां वर म्हणाले ॥ १२५ ।

जा हो चालता वाडियांत । म्हणतां देव आज्ञा वंदित ॥
नमन करून चरणाप्रत । पोतले परत वाडिया माजी ॥ १२६ ॥

झालेली सर्व हकीगत । घडली जैसी तैसी यथार्थ ॥
जोगांस आणि बालकरामाप्रत । केली निवेदित साद्यंत ॥ १२७ ॥

पुढें एक सबंध घटका । उडाला शिव्या शापांचा दणका ॥
प्रहरा दों प्रहरां मागें मग लोकां । बाबाच अवलोका आमंत्रित ॥१२

देवही मग तेथें आले । इतरां माजीं जाऊन बैसले ॥
म्हाताऱ्याचिया जीवा लागलें । असेल मग बोले श्रीसाई ॥ १२

चिंधीची ती कथा काय । तरी म्या दुरुक्तीं केलें घाय ॥
होतीच चोरिली त्या काय उपाय । बोलल्या शिवाय रहावेना ॥१३

असो अल्ला सारें बघील । तोही तयाचें बरें करील ॥
तंबए भाऊ दक्षिणा देसील । पुसती क्षमाशील श्रीसाई ॥ १३१ ॥

किती आणूं देव पुसती । बारा घेऊनि येई त्वरिती ॥
पाहूं जातां नोटचि होती । रुपये न मिळती तियेचे ॥ १३२ ॥

तैसेंच बाबांस कथिलें । राहूंदे मज नको ते वदले ॥
ाळीं त्यां दोनदां दिधले । स्मरण न राहिलें मज त्याचें ॥ १३३ ॥

ही देवांनीं रुपये मिळविले । बाबा लागीं आणून दिधले ॥
ं तयांचें चरणही वंदिले । परिसा मग निघाले जे बोल ॥ १३४ ॥

य रे तूं करीत असशी । " कांहीं नाहीं " वदतां तयासीं ॥
थी वाचीत जा नेमेंसी । केलें देवांसी आज्ञापन ॥ १३५ ॥

डिया माजी जाऊन बसावें । नित्य नेमें वाचीत जावें
चितांना सांगतही असावें । निरूपण भावें सकळिकां ॥ १३६ ॥

बंध भरजरी सुंदर शेला । बसलों असतां तुज द्यावयाला ॥
ासी कां चिंध्या चोरावयाला । सवई कां तुजला चोरीची ॥ १३७ ॥

ासो करावें पोथी वाचन । साई मुखीचें हें वचन ॥
ाूनि माझी मी अंतरी खूण । अति सुखसंपन्न जाहलों ॥ १३८ ॥

ानूनि ती आज्ञा प्रमाण । मग म्यां तया दिवसापासून ॥
नेत्य ज्ञानेश्वरीचें वाचन । तैसेंच निरूपण आरंभिलें ॥ १३९ ॥

मिळाली आज्ञा वांछिली आतां । फिटली व्रतस्थ मनाची चिंता ॥
येथून मज ज्ञानेश्वरी वाचितां । येईल नियमितता वाचना ॥ १४० ॥

आतां मी गुर्वनुज्ञाधर । आतां प्रसन्न मज ज्ञानेश्वर ॥
माजी पडलें जें झालें आजवर । वर्तणें अतःपर नियमानें ॥ १४१ ॥

साक्ष मजला माझें मन । वरी साई आज्ञा प्रमाण ॥
आज्ञाबळें पोथी पारायण । आतां मज निर्विघ्न घडेल ॥ १४२ ॥

बाबा मी येतों लोटांगण । अनन्य भावें तुम्हा शरण ॥
पदरीं घ्याया लेकरा आपण । करवून घ्या वाचन मज करवी ॥१४३॥

चिंधी तें काय ध्यानांत आले । बालकरामास होतें जें पुसिलें ॥
त्याच चिंध्या तेंच न रुचलें । साईस जें भरले रागानें ॥ १४४ ॥

कैसें तुम्हास उपासनेस । कैसें परब्रम्ह चिंतनास ॥
लाविलें म्हणून बाळकरामास । पुसिलें तें बाबांस नावडलें ॥ १४५ ॥

वाटेल त्या प्रश्नाचें उत्तर । स्वयें द्यावया असतां तत्पर ॥
किमर्थ चौकशा कराव्या परस्पर । म्हणोनि मज दुर्धर छळियेलें ॥१४६॥

" छळियेलें " हे बोलचि उद्धत । प्रेमें भक्तार्थ जो ओथंबत ॥
भक्तवत्सल ज्या स्वप्नींही न दिसत।छळणें त्या अनुचित क्रियापद॥१४७॥

छळिलें नव्हे मज शिकविलें । चित्तीं तुझिया जेंजें उद्भवलें ॥
तें तें म्या पाहिजे स्वयें पुरविलें । कधीं न चोरिलें कामा ये ॥ १४८॥

साई बाह्य क्रोधाभिभूत । अंतरीं ते नित्य मुदित ॥
बाह्य संतापे दिसत संतप्त । अंतरीं ते तृप्त आनंदें ॥ १४९ ॥

क्रोधाचें बाह्य लौकिक लाघव । अंतरीं परमानंद गौरव ॥
तया साईचें लीला वैभव । गावया सुदैवचि पाहिजे ॥ १५० ॥

साधावया निज स्वार्थ । जया पोटीं अत्यंत आर्त ॥
शिव्या पुष्प लाखोल्या मानित । दृष्टी निजहित तत्पर ॥ १५१ ॥

परिसनि कर्णकटु अश्लील वचन । डळमळेना देवाचें मन ॥
पोटीं प्रेमाचें भरतें गहन । वाटे तें ताडण पुष्पांचें ॥ १५२ ॥

दुग्धें भरली धेनूची कास । भाग्यवानास लाभे गोरस ॥
कासे पासीचगोचिडावास । अशुद्धचि कर्मास तयाच्या ॥ १५३ ॥

दर्दुरा कमलकंदा शेजार । लुटी कमल मकरंद भ्रमर ॥
दुर्दैवी दर्दुरांपंकाचा आहार । दैवास न पार भ्रमराच्या ॥ १५४ ॥

तैसे तुम्ही भाग्यवान । तुम्हा आम्हा संन्निधान ॥
मानेल तें घ्यारे पुसून । शंका समाधान साईवदें ॥ १५५ ॥

यहा माझी पोथीची अढी । वाचीन " वाच " वदतिल ते घडी ॥
तोंवर ज्ञानेश्वरी मी नुवडी पुविली रोकडी बाबांनी ॥ १५६ ॥

कैसी माउली करी लाड। निजबालकाचे पुरवी कोड ॥
तयाची ही प्रतीती गोड। भक्तीची जोड ही कथा ॥ १५७ ॥

वाच म्हणून नाहीं थांबले। देव वदती वर्ष न उलटलें ॥
स्वप्नीं येऊन दर्शन दिधलें। आश्चर्य मज पुसिलें तें परिसा ॥ १५८ ॥

सन एकुणीससें चवदा। एप्रील दुसरी तारीख तदा ॥
वार गुरुवार उजाडतां एकदां। स्वप्न प्रसादा पावलों ॥ १५९ ॥

समर्थ साई स्वप्नीं आले। आहेत माडीवरती बैसले ॥
पोथी समजते का मज विचारले। उत्तर दिधलें नकारीं ॥ १६० ॥

तैसाच प्रश्न झाला नंतर। मग ती केव्हां समजणार ॥
आलें माझिया नेत्रास नीर। काय म्या प्रत्युत्तर दिधले ॥ १६१ ॥

कृपा आपुली झालिया वीण। पोथी वाचणें केवळ शीण ॥
समजणें तो त्याहूनही कठिण। बाबा मी निक्षून सांगतों ॥ १६२ ॥

बाबा वदती पोथी पढता। फारचि आपण घाई करितां ॥
वाचा पाहूं ती मज देखतां। निकट बैसतां मज पाशीं ॥ १६३ ॥

काय वाचूं देव वदती। अध्यात्माची आज्ञा देती ॥
देव पोथी आणूं जाती। नेत्र उघडती तात्काळ ॥ १६४ ॥

देव तव्हां जागे होती। स्वप्नस्थिती पाहुनि निश्चिती ॥
काय वाटावें तयांचे चित्तीं। कल्पना श्रोतीं कीजेती ॥ १६५ ॥

पाहूनिया वर्षभर वाट। मानीं की बाळ आज्ञा नीट ॥
करितों कीं नित्य पोथीचा पाठ। काळजी उद्भट ही कोण ॥ १६६ ॥

पाळी काय लाविली शिस्त। दिधला धडा गिरवी का नित्य ॥
चुके कोठे वा किंनिमित्त। कवण हें सतत पाहील ॥ १६७ ॥

वांचकें असावें कैसें दक्ष। ठेवणें कोठें विशेष लक्ष ॥
साई माउलीवीण प्रत्यक्ष। कवण ही साक्ष पटवील ॥ १६८ ॥

ऐसी साई समर्थ लीला। ऐसा स्वानंदाचा सोहळा ॥
भक्तीं भोगिला असंख्य वेळा। देखिला म्यां डोळा प्रत्यक्ष ॥ १६९
आतां आपण श्रोते मंडळी। होऊं कीं लीन गुरुपद कमळीं ॥
परिसूं पुढील कथेची नव्हाळी। यथाकाळीं पुढारा ॥ १७० ॥
आठवूनि श्रीसमर्थ चरण। सद्भावें मी येई लोटांगण ॥
तेणेंच सकल भव दुःखविमोचन। भावार्थें शरण हेमाड ॥ १७१ ॥
साईच एक तयाचा स्वार्थ। साईच निरतिशय सुखपरमार्थ ॥
साईच तया करील कृतार्थ। निश्चित हा भावार्थ तयाचा ॥ १७२ ॥

इतिश्री संतसज्जन प्रेरिते। भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साई समर्थसच्चरिते। साईकृपानुग्रहदानं नाम
एक चत्वारिंशत्तमोऽध्यायः संपूर्णः ॥

श्रीसद्गुरूसाईनाथार्पणमस्तु। शुभंभवतु ॥

## श्रीसाईनाथ प्रसन्न

### सालमजकुरीं. शिर्डी येथील गोकुळ अष्टमी उत्सवाचा कार्यक्रम खालील प्रमाणें ठरला आहे.

श्रावण कृ० १ ( तारीख २४ आगष्ट ) मंगळवारीं सकाळीं नामसप्ताह सुरु होईल व श्रावण कृ० ९ मंगळवारीं सकाळीं नित्याप्रमाणें काकड-आर्ती होऊन समाप्त होईल. सप्ताहाचे प्रसंगीं हरिभक्तपरायण मारुतीबुवा यांचें कीर्तन होईल:—

श्रावण कृष्ण ८ सोमवारीं मध्यरात्री श्रीकृष्ण जन्मोत्सव होईल.
श्रावण कृष्ण ९ मंगळवारीं दिवसा भंडारा होऊन
रात्रौ दिंड्यांसह पालखीची मिरवणूक होईल.
श्रावण कृ० १० बुधवारीं सकाळीं काला होईल.

या उत्सवास समर्थभक्तांनीं अवश्य येण्याचें करावें. उत्सवाप्रीत्यर्थ कोणाला कांहीं पाठवावयाचें असल्यास तें रा. रा. तात्या गणपतराव पाटील कोते यांचे नावें मुक्काम पोष्ट शिर्डी, तालुका कोपरगांव जिल्हा अहमदनगर या पत्त्यावर पाठवावें.

आपले
तात्या गणपतराव कोते
पाटील
रामचंद्र दादा पाटील.

**सूचना:**—स्फुट पृ. ३७० प्यारा १२ ओळ २१ मध्यें रु. चे पुढें २०० रक्कम वाचावी.

श्री साईलीलेंत जाहिराती घेण्याचें ठरविलें आहे. या पानावरील सर्व जागा जाहिरातीकरितां मोकळी आहे. जाहिरात देणारानें आमचेकडे पत्रव्यवहार करावा. खालील पुस्तकें आमचेकडे मिळतील.

**श्रीसाईनाथ सगुणोपासना किं. ०=**

**ह. भ. प दासगणु कृत**

**संतलीलामृत**

**भक्तलीलामृत**

**गो. र. दाभोळकर**

५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें मुंबई नं. २०

श्री साईनाथ भजनमाला, श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर, रंगाऱ्याची चाळ वांद्रें येथें मिळेल.

**आख्यान--रत्न--माला, नांदेड.**

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी **दासगणू** महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतीनें पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

**ग. अ. सराफ, नांदेड.**

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें [illegible] मारा‍म मोरमकर यांनीं छापून [illegible] सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.

१८८८ 

३८७

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ४ थें.] श्रावण शके १८४८ [अंक ६.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.
श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड वांद्रे, बी. बी. रेल्वे.

३८८

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| स्फुट विषय. ... ... ... ... | २८३-४१२ |
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | ५३१-५३८ |
| श्री साईसच्चरित ... ... ... ... | ७११-७२६ |


## वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरीनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

## श्री साईसच्चरित.

या श्री साईलीला मासिकांत प्रसिद्ध होत असलेला हेमाडपंत विरचित श्री साईसच्चरित नामक ओवीबद्ध ग्रंथ आतां संपन्न आला असून लवकरच तो पुस्तकरूपानें बांधवून श्री साईलीला ऑफिसांत विक्रीस ठेवण्यांत येणार आहे. या सबंध ग्रंथाचीं पृष्ठें अजमासें ८०० वर होतील व यांत आरंभापासून अखेरपर्यंत प्रसिद्ध झालेले व होणारे सर्व फोटो व देखावे हेही प्रसिद्ध होतील. ग्रंथाची किंमत ३ रु. ठेविली जाईल. सोबत छापील कार्ड आहे त्यावर सही होऊन परत येतांच तो पाठविणाराचें नांव व पत्ता श्री साईलीला ऑफीसांत नोंदला जाईल. आज फक्त ग्राहक होऊं इच्छिणारांनीं या पत्यावर आपलीं नांवें व पत्ते नोंदवावेत. पुरेसे ग्राहक होतांच पुस्तकें बांधवून व्ही. पी. नें रवाना केलीं जातील.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

५ सेंट मार्टिन्स रोड ( मुंबईनजीक ) बांद्रें.

ता. क. पुस्तकविक्रीचें होणारें उत्पन्न श्री शिर्डी कायम-फंडांत जमा होईल.

# श्री साईलीलेचें धोरण

## श्री सद्गुरुसाइराजायनमः

सा. न. वि. वि. खालील मजकुरास व विनंतीस आपल्या विबुधमान्य श्री साइलीलेच्या एखादे अंकीं कृपेनें जागा मिळावी अशी सविनय प्रार्थना आहे.

### शार्दूल विक्रीडित.

ज्या आदी, नच, मध्य, अंत, परि जो ब्रम्हांड भांडोदरा।
व्यापूनी न दिसे, पयीं घृत जसें, इक्षूरसीं शर्करा।
ओढी मायिक विश्वसूत्र लपुनी, विश्वासि जो आसरा।
साष्टांग प्रणती तया नटवरा श्री साइ विश्वंभरा।

---

## " भिन्नरुचिर्हि लोकः "

श्री साईलीलेंत कोणते विषय यावेत, कोणते येऊं नयेत, तिचें अंतर्बहिरंग कसें असावें, तिच्यांत सर्वच गद्य असावें अथवा थोडें गद्य व थोडें पद्य असावें, व तें कोणत्या स्वरूपाचें असावें याबद्दल थोडी प्रत्यक्ष व थोडी अप्रत्यक्ष चर्चा ऐकूं आल्यावरून प्रिय वाचकांपुढें मी दोन शब्द ठेवीत आहे. त्याचा श्री साईभक्त, श्री साईलीलाभक्त, श्री साईलीला वर्गणीदार व वाचक यांनीं सहृदय अंतःकरणानें विचार करावा अशी माझी त्यांस नम्र विनंती आहे.

वरतीं अवतरणांत दिल्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीची आवड निराळी आहे. प्रत्येकाच्या आवडीप्रमाणें प्रत्येक गोष्ट होणें शक्य नसतें. कार्यप्रयोजनांत निरनिराळ्या आवडीचे व निरनिराळ्या स्वभावाचे स्त्री-पुरुष व मुलेंबाळें भोजनास येतात. त्या ठिकाणीं प्रत्येकाच्या रुचिवैचित्र्याप्रमाणें व

स्वभाववैचित्र्याप्रमाणें पदार्थ निर्माण करणें अशक्य असतें. म्हणून नानाप्रकारचे व भिन्नभिन्न रुचि देणारे पदार्थ तयार करतात. मग ज्यास जशी आवड असेल त्याप्रमाणें तो त्यांपैकीं सर्व अथवा कांहीं पदार्थ कम जास्त प्रमाणानें पण तृप्ती होईपर्यंत खातो. त्याचप्रमाणें श्री साईलीलेचे वाचकही भिन्नरुचीचे असणार. कोणास नुसतेंच गद्य आवडेल तर कोणास नुसतें पद्यच आवडेल. कोणास दोन्हीही आवडतील. कोणास मराठी भाषाच आवडेल तर कोणास संस्कृतच आवडेल, कोणास इंग्रजी आवडेल तर कोणास गुजराथी आवडेल; कोणास एकच भाषा येत असेल तर कोणास दोन, कोणास तीन व कोणास चारही भाषा अवगत असतील. व ज्याप्रमाणें एकाच गव्हाचे पदार्थ पण निरनिराळे कुशल बल्लव, अथवा निरनिराळ्या चतुर स्त्रिया निरनिराळ्या तऱ्हेनें ते तयार करतात व त्यांचा भिन्न भिन्न आस्वाद भोजनप्रेमी व तृप्तीच्छु जनांना उपभोगण्यास मिळतो; त्याच प्रमाणें श्री साईलीलेंतही गद्य व पद्य हीं दोन्ही व तीं वर लिहिलेल्या चारी भाषेंत असावीं व त्या प्रमाणेंच एखादा दुसरा अपवादात्मक अंक खेरीज करून आजपर्यंत श्री साईलीलेचें धोरण राखलें गेलें आहे.

आतां श्री साईलीलेंत अनुभवा खेरीज दुसरे कांहीं विषय येऊं नयेत असेंही कित्येकांना वाटतें, व तें तसें वाटणेंही साहजिकच आहे. कारण या मासिकाचें नांवच श्री साईलीला असें आहे. पण त्यावेळीं हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं श्री शिर्डीसंस्थान व बाबा यांच्या संबंधानें अनुभवाव्यतिरिक्त इतर गोष्टी व माहिती श्री शिर्डी संस्थानहितेच्छु साईभक्तांस कळण्यास ह्या मासिकावांचून अन्य साधन काय आहे ? माझ्यामतें श्रीसाईलीलेंत बाबा व शिर्डी संस्थान या व्यतिरिक्त कांहीं विषय येऊं नयेत; परंतु अनुभवावांचून इतर तत्संबंधीं कोणताही विषय येऊं नये असें म्हणून कसें चालेल? संस्थान व बाबा यांच्या संबंधांचे सर्व विषय त्यांत आले पाहिजेत व त्यांची चर्चा व ऊहापोहही झाला पाहिजे. वस्तुस्थिति पाहतां हल्लींही त्याप्र-

माणें होत आहे. शिर्डी संस्थानची व्यवस्था, नगर कोर्टाचा तत्संबंधीं ठराव, ट्रस्टी कमेटीचे सभासद, त्रैवार्षिक सभासदांच्या, निवडणुकी संस्थान व्यवस्थे-संबंधाचे वार्षिक रिपोर्ट, उत्साहांची हकीकत व जमाखर्च, संस्थानचे जमाखर्च, बाबांचीं स्तुतिस्तोत्रें तत्संबंधीं कुटकें, श्लेष वगैरे गोष्टी "लीला" म्हणून कोणी समजणार नाहीं. तथापि ही सर्व माहिती संस्थान व बाबांसंबंधीं असल्यामुळें व ती श्रीसाईलीला व इतर वाचकवर्गास समजणें अत्यंत जरू-रीचें असल्यामुळें ती व तशीच प्रकारची पण तत्संबंधीं दुसरीही महत्वाची हकीकत किंवा माहिती किंवा योजना श्री साईलीलेंत येणें अत्यंत अगत्याचें आहे.

मासिकांस अथवा वृत्तपत्रांस जीं नावें असतात त्याच नांवांस अनु-सरून तो एकच विषय त्यांत येतो असें नाहीं. त्याचा अर्थ असा कीं तन्नाम-दर्शकविषय त्यांत प्रामुख्यानें असतो व तदनुषंगिक इतरही सर्व विषय त्यांत असतात, नसतात असें नाहीं. एखादे घरीं जेवणावळ असल्यास व आज जेवणावळ अथवा प्रयोजन कशाचें आहे म्हणून कोणासही विचारल्यास "आज बुंदीची अथवा श्रीखंडाची अथवा जिलबीची" जेवणावळ आहे असें सांगण्यांत येतें. म्हणजे जेवणांत अथवा प्रयोजनांत जी वस्तु अथवा जें पक्वान्न मुख्य असतें त्याचें नांव जेवणावळीस अथवा प्रयोजनास मिळतें. म्हणजे त्यांत जेवण्याचे इतर जिन्नस नसतात असें नाहीं. व ते तसे नसतील व नुसतें पक्वान्नच असेल तर त्या पक्वानाची मिठी बसून तें खावणार नाहीं, पचणारही नाहीं, तशीच हुबेहुब स्थिति मासिकांची व वृत्तपत्रांची असते. त्यांतही मुख्य विषयाशिवाय तदनुषंगिक इतर विषय थोडयाबहुत प्रमाणानें यावे लागतात. श्रीसाईलीलेंतही अनुभवाखेरीज, नेहमींच नव्हे पण कधीं कधीं, उपरिनिर्दिष्ट केलेले संस्थानसंबंधी व बाबांसंबंधीं विषय जसे येतात तसेंच " बाबांचें स्मारक, निरंतरचे खर्चास लागणाऱ्या द्रव्यनिधि समुच्चय सूचना, बाबांच्या चरित्रलेखना करितां लागणारी निरनिराळ्या प्रकारची माहिती वगैरे वगैरे " यां सारखे विषयही यावयास पाहिजेत.

आतां हें मासिक आहे हेंही विसरून चालणार नाहीं. मासिक या नात्यानें त्यांत "पुस्तकावरील अभिप्राय, संपादकीय सूचना, बाबांच्या कायम-निधि उपाययोजना व तत्संबंधीं जरूर त्या जाहिराती " यावयास पाहिजेत. या सर्वांचा वर दिलेल्या संस्थानसंबंधीं माहितीचा व कार्यक्रमाचा समावेश खात्रीनेंच "अनुभव अथवा लीला " यांत होणार नाहीं. तथापि वरील सर्व गोष्टी अत्यावश्यक आहेत. मग त्या श्रीसाईलीलेंत आल्या नाहींत तर कोठें येणार? मला वाटतें हल्लीं चालू असलेलेंच श्री साईलीलेचें धोरण बहु-जनसमाजास मान्य होण्यासारखें आहे. कित्येक मंडळी अपवाद म्हणून असतील. पण त्यास इलाज काय? त्या श्रीसद्गुरुरायांच्या इच्छेनेंच श्रीसाईलीला चालत आहे व त्यांत काय यावें याची स्फूर्ती तेच लेखकभक्तांस देत आहेत. तरी अशाच रीतीनें हें मासिक सर्वांगसुंदर होण्यास आणखी कोणा सद्भक्तांस योग्य त्या सूचना करणें असल्यास त्यांनीं कराव्या, व मासिकाचें अस्तित्व कायम राखून त्यास चिरायू करावें अशी सर्व साईभक्तांस व ज्यांच्या केवळ नामोच्चा-रानें "मुक्ति" ही मनुष्याची दासी बनते त्या श्री ब्रह्मांडनायक सद्गुरु साईरा-जास अंतःकरणपूर्वक सविनय प्रार्थना करून त्यांच्याच प्रेरणेनें व कृपेनें सुचलेले विचार व केलेलीं दोन वाक्सुमनें मथळ्यावरील शार्दूलविक्रीडित व शेव-टचें उपजाति, त्याच प्रभुपादपुंडरिकावर अनन्यभावें अर्पण करून आपली रजा घेतों.

## उपजाति वृत्तम्.

किमत्र चित्रं यदि " साइ " मंत्रम् ।
जपेत् सदा यः परमं पवित्रम् ।
तद्दासिका मुक्तिरहो विचित्रम्
एवं हि तद्दत्तगुरो श्चरित्रम्॥

**अर्थः**—परम पवित्र असा जो " साइ " नामरूपी मंत्र तो जो मानव सदासर्वकाळ जपत राहील त्याची " मुक्ति " ही दासीच आहे, यांत आश्चर्य कसलें ? कारण, अहो त्या दत्तगुरूचें चरित्रच असें कांहीं विलक्षण आहे.

ठाणें. ९-९-२६ } बाबांचें बाळ.

# शिर्डी संस्थान कायमनिधि समुच्चय योजना

## श्रीसाई दत्तगुरुवे नमः

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।**
**मा कर्मफल हेतुर्भू र्मातेसंगोस्त्वकर्मणि ॥**

श्री. भगवद्गीता श्लो. ४७ अ. २.

बाबांच्या स्मारका संबंधानें फार दिवस मनांत घोळत असलेले विचार प्रिय वाचकां पुढें मांडण्याकरितां आपलेकडे पूर्वींच पाठविले आहेत. ते आपल्या सवडी प्रमाणें आपल्या श्री साईलीलेच्या एखादे अंकीं आपण वाचक पुढें ठेवालच. त्यांत अशक्य असें कांहींच नाहीं. माझ्या रूपरेषेप्रमाणें स्मारकास लागणाऱ्या पैशापेक्षां कल्पनातीत पैशाचीं कामें जगांत लाखों ठिकाणीं होत आहेत. मी रेखाटलेल्या स्मारक चित्रांतील सर्वच कार्यें एकसमयावच्छेदें-करून केव्हांही होणार नाहींत व त्यांस लागणारा द्रव्यनिधिही एकदम जमा होणार नाहीं. पण "जलबिंदु निपातेन क्रमशः पूर्यते घटः" यी न्यायानें तो गोळा केला पाहिजे. व हें कार्य सर्व साईभक्तांनीं मनावा ॅतलें पाहिजे. प्रयत्न करण्याचें काम आपलें आहे, तें सिद्धीस जाईल किंवा

नाहीं हें पाहाण्याचें किंवा एवढें अवाढव्य काम आपल्या हातून कसें होणार असल्या निराशेच्या मनोराज्यांत स्वस्थ बसण्याचेंही काम आपलें नाहीं. काम करण्यापुरताच अधिकार आपला आहे. म्हणून आपण नाउमेद न होतां नेटानें व निश्चयानें बाबांचें नांव घेऊन काम करीत राहावें. सिद्धीस नेणार श्रीमंतांचे श्रीमंत, सार्वभौमाचे सार्वभौम व कुबेराचेही कुबेर श्री सद्गुरुराज समर्थ आहेत. प्रसिद्ध श्री क्षेत्र काशी येथील हिंदु विश्वविद्यालय किंवा पुण्याजवळील हिंगणें येथील स्त्री-विश्वविद्यालय, त्याच प्रमाणें नगर-रचना व सुधारणे ( टाउन प्लानिंग ) च्या कायद्याप्रमाणें मुंबापुरींत व मुंबापुरीचे आसपास तसेंच पुण्यपत्तनांत व त्याचे आसपास ज्या मोठ्या भव्य, दिव्य व गगनचुंबित इमारती, विस्तीर्ण रस्ते, विशाल जागा, उद्यानें, आराम-स्थलें, व्यायाम शाळा वगैरे ज्यांनीं पाहिल्या असतील, त्यांना माझ्या बाबांच्या स्मारक कल्पनेची असंभवनीयता अगर अशक्यता केव्हांच वाटणार नाहीं. मात्र त्या योजनेस विपुल द्रव्य व विपुल काल लागणार आहे, हें मलाही कबूल आहे. पण प्रयत्नाअंतीं जर परमेश्वर पावतो तर ही योजना तरी अशक्य कां ?

हें सर्वांस विदितच असेल कीं महाराजांच्या नित्य दिनचर्येच्या खर्चास लागणाऱ्या द्रव्यनिधी करितां प्रथमतः एक लक्ष रुपये जमवावे, असें ठरलें आहे. एक लक्षाचा कायमनिधि जमल्यावर त्याचें व्याज दरमहा ६०० किंवा कमीत कमी ५०० रुपये तरी येईल व इतक्या रकमेंत हल्लीं शिर्डीत संस्थानकडून होत असलेल्या व्यवस्थेपेक्षां खात्रीनें जास्त उत्तम मोठ्या प्रमाणावर कायमची व्यवस्था कोणासही करतां येईल.

या कार्यासाठीं आतांपर्यंत अजमासें १८००० ते २०००० पर्यंत रुपये जमले आहेत. ८०००० किंवा ८२००० रु. अद्याप जमविणें आहे व त्याकरितां माझ्या अल्प मतीस जे कांहीं मार्ग सुचत आहेत ते मी नम्रपणें प्रियभक्तांपुढें व प्रिय वाचकांपुढें ठेवीत आहें. त्याचा त्यांनीं सहृ-

दयतेनें विचार करावा व पसंत वाटल्यास ज्यांस जे मार्ग आवडत असतील किंवा शक्य वाटत असतील त्यांनीं तो किंवा ते मार्ग लागलीच आचरण्यांत आणण्यास सुरवात करावी.

१. आजपर्यंत श्रीयुत कै. रा. रा. काकासाहेब दीक्षित प्रभृति शिर्डी संस्थानचालक व व्यवस्थापकांकडून झालेल्या व होत असलेल्या मनःपूर्वक मेहनतीमुळें या कायमनिधि करतां जवळ जवळ ३५००० किंवा ४०००० रुपयांपर्यंतचे आंकडे पडले आहेत. त्या पैकीं ज्या सद्भक्तांकडून अथवा सद्गृहस्थांकडून अद्याप कांहीं वसूल आला नाहीं त्यांनीं अत्यंत कृपेनें त्या रकमा एकदम किंवा हप्त्याहप्त्यानें होतां होईल तितक्या काळजीनें व निश्चयानें जितक्या लवकर देतां येतील तितक्या लवकर देण्याची तजवीज करावी.

२. बाबांच्या ज्ञात व अज्ञात अशा दोन्ही भक्तांची संख्या अगणित आहे. त्या पैकीं उत्कंठा, उमेद व सामर्थ्य असणाऱ्या १०० भक्तांनीं प्रत्येकीं एक हजार १००० रुपये स्वतः आपण अथवा हस्तें परहस्तें आपल्या सोयऱ्यांधायऱ्यांकडून अगर इष्टमित्रांकडून, तसेंच धनिक, सावकार, व्यापारी, नौकर, शेतकीवाले, इनामदार, जहागिरदार, राजेरजवाडे यांजकडून एक किंवा दोन वर्षांचे आंत मिळवून देण्याची तजवीज करावी. असंख्य साईभक्तांत वर सांगितल्या प्रकारचे १०० भक्त निघणार नाहींत असें मला तरी वाटत नाहीं.

३ प्रत्येक श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारानें श्रीसाईलीलेची वार्षिक वर्गणी खेरीज करून शिवाय एक वर्षपर्यंत दरमहा १ रुपया या फंडा करतां द्यावा. यायोगें एक वर्षांत सहज कोणावरही विशेष बोजा न पडतां सुमारें ७ पासून ८ हजारापर्यंत निधि जमेल.

४. ज्याच्या त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या माना प्रमाणें जसा व्यापारीवर्ग आणि नोकरवर्ग आपल्या प्राप्तीवर रुपयास ३, ६, ९, १२, २४ पै

प्राप्तीवरील कर म्हणून सरकारास भरतो, किंवा शेतकरीवर्ग आपल्या वार्षिक प्राप्तीवर रुपयास १ किंवा २ आणे लोकलफंड सरकारास भरतो किंवा कित्येक व्यापारी संस्था आपल्या वार्षिक उत्पन्नावर रुपयास १ पै अथवा जास्त पै या प्रमाणें धर्मादाय म्हणून निराळी रकम काढून ठेवतात, त्याच प्रमाणें प्रत्येक साईभक्तानें आपल्या नैतिक, मासिक व वार्षिक उत्पन्नांतून रुपयास १ अथवा इच्छा असेल तितक्या पै काढून ठेवून ते पैसे दरसाल कायमनिधीस देत जावे.

५. श्रीसाईभक्तांनीं व श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारांनीं प्रत्येकीं त्यांचे घरीं प्रत्येक सणाकरतां, व्रताकरतां, नेमाकरतां, दानाकरतां, उद्यापना करतां, वाढदिवसा करतां, जयंती, उत्साह, कुलधर्म, कुलाचार, पर्वणी, श्राद्धपक्ष, मुंज, सोडमुंज, विवाह, गर्भाधान, चौल,श्रावणी, कोजागरी, विद्यारंभ, यात्रा, यज्ञयाग, नवस, कथापुराण, परीक्षा पास होणें, नोकरी लागणें, लाटरींत बक्षिस मिळणें स्कालरशिप मिळणें, वगैरे बाबतींत अनुक्रमें जो खर्च होत असेल किंवा त्यास जी जी अधिक प्राप्ती होत असेल त्या मानानें त्यानें या निधी करितां कांहीं तरीं शक्त्यनुसार रक्कम काढून ठेवावी व खजीनदार यांजकडे पाठवावी. या रकमा दिसण्यांत जरी लहान दिसल्या तरी प्रत्येक साईभक्तानें मनावर घेतल्यास यापासूनही प्रत्येक वर्षी कायमनिधीस बरीच मोठी मदत झाल्यावांचून राहाणार नाहीं.

६. वर लिहिल्या पैकीं एक किंवा अनेक मार्गाचें अवलंबन करून कायमनिधि उभारण्याची सेवा जर साईभक्तांकडून घडली तर प्रत्येक साईभक्त बाबांचा सदैव ऋणीच आहे. म्हणून वर सुचविलेल्या मार्गाशिवाय आणखी ज्यांस जे मार्ग सुचतील व ज्यांस जे आवडतील त्यांनीं त्या त्या मार्गाचे अवलंबन करून बाबांचा कायमनिधि जमविण्याची व वृद्धिंगत करण्याची खटपट सदैव करीतच राहावें.

तूर्त वर प्रमाणें माझ्या नम्रपणाच्या सूचना आहेत. बाबांचे भक्त प्रत्येकीं आपले घरीं बाबांची सेवा आपापल्या इच्छेनुरूप व द्रव्यानुकूलतेनुरूप नित्य व नैमित्तिक अशी कांहीं तरी करतातच. तथापि बाबांनीं ज्या ठिकाणीं पुष्कळ दिवस निवास केला व जेथें शेवटीं आपल्या मानवी तनूचें विसर्जन केलें त्या पुण्यभूमी मशीद मंदीर व समाधिमातेची व तत्संबंधीं तेथें असणाऱ्या सर्व वस्तूंची निरंतर सेवा करण्याची ही जबाबदारी त्यांचे वरच आहे असें माझ्या अल्प बुद्धीस वाटतें. ती कां असते याबद्दल बाबांच्या चरित्रलेखनास लागणाऱ्या सामग्री पैकीं मी पूर्वी श्रीसाईलीलेच्या ३ रे वर्षाच्या ९ वे अंकांत ज्या एकंदर ७७ सूचना केल्या आहेत त्यांतील २९८ पानावरील ६५ वी "बाबा व बाबांची समाधि" या मथळ्या खालीं केलेल्या सूचनेवर मी पुढें स्वतंत्र व विस्तृतरीतीनें यथावकाश लिहिणार आहें. त्यांत या जबाबदारी बद्दलचा खुलासा होईलच.

एक लक्ष निधीची व्यवस्था वर लिहिलेल्या अथवा अन्य योग्य मार्गांनीं झाल्यावर त्याप्रमाणें पुढें मंदिरांत होणाऱ्या व आतांपर्यंत जमलेल्या रकमेतून हल्लीं मंदिरांत होत असलेल्या व्यवस्थेंत सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत व सूर्यास्तापासून पुन्हा सूर्योदयापर्यंत नित्यशः इतर नैमित्तिक प्रसंगीं ज्या ज्या वस्तूंचा व गोष्टींचा बाबांचे चरणीं उपयोग होईल त्या प्रत्येक वस्तूंत व प्रत्येक गोष्टींत प्रत्येक वर्गणीदार अथवा अन्य प्रकारें पैसे भरलेल्या अथवा भरणाऱ्या भक्ताच्या सेवेचा अंश असणारच. म्हणजे पहाटेच्या काकड आर्तीच्या दिव्याच्या घृतांत त्याचा घृतांश, कर्पूरांत कर्पूरांश, धूपांत धूपांश, नैवेद्याचे शर्करेंत शर्करांश असणारच. त्याच प्रमाणें सकाळचे पूजाद्रव्यांत, गंधांत गंधांश, अक्षतांत अक्षतांश, पुष्पांत पुष्पांश, तैलदीपांत तैलांश, भातांत भाताचा कणांश, वरणांत डाळीचे दाण्याचा कणांश, तुपांत तुपाचे कणीचा, भाजींत भाजीचे फोडीचा, भाकरींत पोळींत पक्वान्नांत अत्यल्प शतांश,सहस्रांश लक्षांश त्याच प्रमाणें ताकांत, दुधांत, कढींत एक बिंदू अथवा बिंदूचा सह-

लाक्षांश अथवा कोट्यंश, कांहीं का असेना पण कांहीं तरी अंश हा असणारच. समाधी पुढें वाजणाऱ्या सनईत त्याचा एक सूर किंवा सुराचा अत्यल्पांश, चौघड्यावरील टिपऱ्यांत त्याचे एक अथवा अत्यल्पांश टिपरु तरी असणारच. पहाटे, सकाळीं, दुपारीं, सायंकाळीं व रात्रीं समाधिपुढें होणाऱ्या पुराणांत व कथेंत व निरनिराळ्या भक्तांनीं म्हटल्या जाणाऱ्या भूपाळ्या, आरत्या, पदें, श्लोक, स्तुतिस्तोत्रें, शेजारत्या, भजन यांत त्याचें एक अक्षर तरी असणारच. सारांश मूळ ठिकाणीं ईशचरणीं त्याची नित्यशः व इतर नैमित्तिक प्रसंगीं त्याची इतकी सेवा घडणारच. अशा प्रकारची घरीं व मूळ ठिकाणीं अंतर्बाह्य सद्गुरुसेवा खरोखरच पूर्वजन्मीचें कांहीं तरी महद्भाग्य असल्यावांचून घडणें कठीण. करितां याही गोष्टीचा विचार प्रिय साईभक्त, प्रिय साईलीला वर्गणीदार व प्रिय श्रीसाईलीला वाचक यांनीं अंतःकरण पूर्वक श्रद्धेनें करावा अशी त्यांस नम्र विनंती करून ज्याच्या प्रेरणेनें वरील विचार व योजना मला सुचल्या आहेत त्या व शेवटील रथोद्धता वृत्तांतील वाक्पुष्प त्या श्रीसमर्थ सद्गुरुचरण कुशेशयावर मनोभावें अर्पण करून, आपली रजा घेतों.

## रथोद्धता.

काळ[1] नेत[3] क्षण[2] ना करा़ल[4] कां ।
साइ-दत्त-गुरु-श्री स्मराल कां ।
संसृती जलनिधी तराल कां ।
जन्म सार्थक खरें कराल कां ॥

ठाणें. }
१०-९-२६ } बाबांचें बाळ.

१ काळ यम. २ आयुष्य ३ नेत नाहीं कां ? ४ दुष्ट भयंकर.

# श्री साईभक्तांस विनंती

शिर्डी मुकामीं श्रीचे समाधीवर अगर पादुकांवर अभिषेक अगर लघुरुद्र, महारुद्र कादसण्या वगैरे धर्मकृत्यें करण्यासाठीं अगर फकीरास अथवा ब्राह्मणास भोजन वगैरे घालाव्यास तसेंच दीपोत्सव, किंवा नंदादीप लावणें वगैरे अनेक रूपानें समर्थाचे पुष्कळ भक्त शिर्डीस लहान मोठ्या रकमा पाठवीत असतात हें ठीकच आहे; परंतु त्या बरोबर शिर्डीच्या "कायम फंडा" कडेही भक्तांनीं लक्ष देणें जरूर आहे.आपण नेहमी ध्वजारोपण, संकष्टी चतुर्थी, शनि, सोम, प्रदोष, गौरीपूजन, मंगळागौरी, रामजयंति, वराहजयंति, वामन जयंती, कृष्ण जयंती, हनुमान जयंती, दत्त जयंती, कालभैरव जयंति,आद्यशंकराचार्य जयंती, नृसिंह जयंती आपापल्या गुरूच्या पुण्यतिथी वैशाखस्नानें शिवरात्री, दशाहरारंभ सावित्री व्रतारंभ, भागवत सप्ताह, व्यासपूजा, दीपपूजा, नागपंचमी, श्रावणी, गोकुळाष्टमी पिठोरी, हरितालिका, गणेश चतुर्थी, ऋषिपंचमी, अनंतचतुर्दशी महालयारंभ,भरणीश्राद्ध, अविधवा नवमी, गजच्छायापर्व, सर्वपित्री अमावास्या, नवरात्रारंभ, घटस्थापन, सरस्वतीपूजन, कोजागरी, लक्ष्मीपूजन, कार्तिकस्नानारंभ, गोक्रीडन, अन्नकूट, वैकुंठचतुर्दशी, त्रिपुरपूजा, धनुर्मासारंभ, माघस्नानारंभ, महोदयपर्व, विजयादशमी—दसरा—हुताशनी, वसंतोत्सवारंभ, इत्यादि पैकीं आपण आपले येथें वर्षाचे वर्षास कांहीं ना कांहीं तरी व्रतें, कांहीं तरी पर्वें, कांहीं तरी पूजा व कांहीं तरी स्नानें आणि उत्सव करीत असतोंच, व तत्प्रीत्यर्थ दक्षिणेच्या मिषानें दरसाल आपला सर्वांचा किती तरी खर्च होत असतो. धर्माच्याकामीं हा व्यय इष्टच आहे.

आतां ज्याची पूजा करावयाची तें प्रधान दैवत तर खरेंच; तरी पण या प्रत्येक वेळीं त्याच प्रधान दैवताच्या बरोबरीचें किंबहुना त्याहूनही अधिक दर्ज्याचें आपल्या गुरुदेवतेचें स्मरण व पूजनही होणें आवश्यक आहे. गुरूच्या महत्वाचें वर्णन करावें तेवढें थोडेंच आहे.

"गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः गुरुस्साक्षात्परब्रह्म" हें मनांत आणलें म्हणजे प्रत्येक कार्यांत होणाऱ्या द्रव्यव्ययाचा इच्छेस येईल तो

अंश आपलें प्रत्यकाचें गुरुदैवत जें श्रीसाईनाथ त्यांच्या प्रीत्यर्थ स्वतंत्रपणे काढला जाईल तर सहजींच श्री साईनाथ संतुष्ट राहून सहज थेंबें थेंबें तळें साचे या नियमानें प्रत्येक साईभक्ताला श्रीसमर्थांचे कायम फंडास अनायासें मदत केल्याचें श्रेय मिळेल.

अशा तऱ्हेचा उपक्रम आपल्यापैकीं कांहीं सद्भक्तांकडून सुरू होऊन त्यांचेकडून खालील प्रकारच्या रकमा श्रीचें कायमफंडाकडे येण्याची सुरुवात झाली आहे हें त्यांना व त्यांचे कुटुंबांतील लहान थोरांस फार श्रेयस्कर व भूषणावह आहे:—

| | |
|---|---|
| आपले घरची गाई प्रसूत होत असतां तिला प्रदक्षिणा केल्याचें श्रेय संपादनार्थ गोप्रदान दक्षिणा ४ इसमांनीं केल्याबद्दल प्रत्येकीं १। रु. प्रमाणें | रु. ५—०—० |
| एका बाईचे मुलगीचे वाढदिवसाप्रीत्यर्थ दक्षिणा | रु. १—०—० |
| अधिक महिन्याचें वाण २ बायांचें .... | रु. २—४—० |
| तीन मुलांचा मराठी व इंग्रजी विद्यारंभ ... | रु. ३—०—० |
| भोजन दक्षिणा .... .... | रु. १—०—० |
| गुरुचरित्र सप्ताह दक्षिणा .... .... | रु. ०—५—६ |

सदरील रकमा जरी अल्प आहेत असें सकृद्दर्शनीं दिसतें तरी आपल्या घरच्या प्रत्येक धर्मकृत्यांत इतर आराध्य दैवताबरोबर श्री साईबाबांचेंही ते आदरानें स्मरणपूर्वक पूजन करीत असतात हें त्यांचें कर्तव्य अत्यंत प्रशंसा पात्र आहे व हें फार अनुकरणीय आहे अशी जाणीव आम्हां सर्व साई-भक्तांत उत्पन्न झाली तर या रकमांची आवक बऱ्याच अधिक प्रमाणावर जाईल. तरी या गोड अनुकरणाची आवड सर्व साईभक्तांत उत्पन्न होवो अशी श्री साईसमर्थचरणीं आमची नम्र विनंती आहे.

संपादक